घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधीच्या अनुषंगाने शहरातील घरे व आस्थानपाच्या मधून कचरा संकलन करण्यासाठी दर/उपयोगकर्ता शुल्क (User Charge) लागू करण्याबाबत.

# वसई विरार शहर महानगरपालिका

जा.क्र.घ.क./ २८० /२०२०-२१

दि. ०४/ ११ /२०२०

संदर्भ :- १) नगर विकास विभाग, शासन अधिसूचना क्र.एसडबल्यूएम-२०१८/ प्र.क्र.१२६(१) व (२)/नवि-३४, दि.१९ डिसेंबर, २०१८

२) नगर विकास विभाग, शासन अधिसूचना क्र. एसडबल्यूएम-२०१८/ प्र.क्र.१२६(१) व (२)/नवि-३४, दि.१ जूलै, २०१९

३) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.स्वमअ-२०१७/प्र.क.१२६/नवि-१४, दि.११ जूलै,२०१९.

४) वसई विरार शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.१५ दि.१९/०९/२०१८.

**प्रस्तावना**

शासनाने संदर्भिय क्र.१ मधील अधिसूचनांनुसार घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य प्रारुप उपविधी प्रसिध्द केली आहे. त्यानुषंगाने प्रारुप अधिसूचनेत नमुद केलेप्रमाणे शहरातील घरे व आस्थापनाच्या मधून कचरा संकलन करण्यासाठी दर/उपयोगकर्ता शुल्क (User Chares) लागु करण्यात आले आहेत. तद्नंतर शासनाने संदर्भिय क्र.२ मधील अधिसूचनांनुसार घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी अंतिम प्रसिध्द केली आहे. त्यामध्ये शहरातील घरे व आस्थापनाच्या मधून कचरा संकलन करण्यासाठीचे दर/उपयोगकर्ता शुल्क (User Chares) खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

**(रक्कम रुपये प्रतिमाह)**

| अ.क्र. | वर्गवारी | दरमहा दर/उपयोगकर्ता शुल्क |
|---|---|---|
| | घनकचरा निर्मिती १०० किलोग्राम पेक्षा कमी | |
| १ | प्रति घर | ५० |
| | व्यावसायिक आस्थापना | |
| २ | दुकाने, दवाखाने इत्यादी | ६० |
| ३ | शोरुम<br>(उपकरणे, फर्निचर, ऑटोमोबाई, इलेक्ट्रॉनिक्स इ.) | १२० |
| ४ | गोदामे | १२० |
| ५ | उपाहारगृहे व हॉटेल | १२० |
| ६ | राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणारी हॉटेल | १६० |
| | रुग्णालये | |
| ७ | पन्नास खाटांपेक्षा कमी | १२० |
| ८ | पन्नास खाटांपेक्षा जास्त | १८० |
| | संस्था | |
| ९ | शैक्षणिक संस्था, वसतिगृहे | ९० |

| | | |
|---|---|---|
| १० | धार्मिक संस्था | ९० |
| ११ | शासकीय/निम्नशासकीय कार्यालये | ९० |
| १२ | विवाह कार्यालये/मनोरंजन सभागृह/एक पडदा चित्रपटगृहे | १००० |
| १३ | खरेदी केंद्रे/बहुपडदा चित्रपटगृहे | १५०० |
| १४ | फेरीवाले | १५० |
| १५ | हंगामी दुकाने किंवा आनंद मेळा/सत्संग/खाद्य महोत्सव/फटाक्याचे दुकान | स्थानिक स्वराज्य संस्थांनी मासिक शुल्क न आकारता एक वेळे शुल्क निर्धारीत करावे. |

सदर अधिसूचना जारी होण्याच्या अगोदर एखादी महानगरपालिका उपरोक्त शुल्कापेक्षा जास्त दराने उपयोगकर्ता शुल्क आकारत असल्यास सदर महानगरपालिकांनी अशा दराने आकारणी करावी. उपरोकत दर हे दरवर्षी ५% वाढविण्यात यावेत, असे अधिसूचनेत नमुद केले आहे. तसेच संदर्भिय क्र.३ अन्वये अधिसूचनेच्या दिनांकापासून सदर उपविधीची अंमलबजावणी राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषद/ नगरपंचायतीमध्ये करण्यात येईल. अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन, सदर उपविधी विहीत केले असल्याने, उपविधी लागू करण्यासाठी महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या ठरावाची वा स्वतंत्र मान्यतेची आवश्यकता असणार नाही, असे आदेश देण्यात आले आहेत.

**आदेश**

१) वसई विरार शहर महानगरपालिका, सर्वसाधारण सभा ठराव क्र.१५ दि.१९/०९/२०१८ अन्वये निश्चित केलेले दर हे शासनाने महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४५० (अ) अन्वये अधिसूचित केलेल्या "महानगरपालिका घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) स्वच्छता व आरोग्य उपविधी" मध्ये नमूद केलेल्या दरापेक्षा कमी असल्याने शासन अधिसूचनेच्या दराने आकारणी करणेत यावी.

२) संदर्भ क्र.२ ची अधिसूचना व संदर्भ क्र.३ शासन आदेशानुसार, वित्तीय वर्ष २०२१-२०२२ पासून अधिसूचनेत नमुद केल्याप्रमाणे शहरातील घरे व आस्थापनाच्या मधून कचरा संकलन करण्यासाठीचे दर/उपयोगकर्ता शुल्क (User Chares) लागु करण्यात येत आहेत. उपरोक्त दर हे दरवर्षी ५% वाढविण्यात यावेत.

३) संबंधित मिळकतधारकांचे कर बिलात सदर उपविधीत नमुद केलेप्रमाणे दर/उपयोगकर्ता शुल्क समाविष्ट करावेत. याबाबतची जबाबदारी कर विभागाची असेल.

४) माहिती तंत्रज्ञान विभागाने वरील आदेशानुसार संगणक प्रणालीत तात्काळ आवश्यक ते बदल करावेत. याबाबतची जबाबदारी कर विभागाची असेल.

५) फेरीवाले, हंगामी दुकाने किंवा आनंद मेळा/सत्संग/खाद्य महोत्सव/फटाक्याचे दुकाने यांचेकरिता उपयोगकर्ता शुल्क आकारणी व वसुलीबाबत आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मालमत्ता विभागाची असेल.

9/11/2020

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

प्रति,

१. अतिरिक्त आयुक्त (उत्तर)
२. उपायुक्त (मालमत्ता कर विभाग)
३. माहिती तंत्रज्ञान विभाग
४. सहा.आयुक्त (सर्व)